# महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण २०२२ /(०३/२०२२) /संकाक

जलसंपदा विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०००३२.
दिनांक :- १४/३/२०२३

प्रति,
सर्व कार्यकारी संचालक/महासंचालक, जलसंपदा विभाग
सर्व सह सचिव/उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय
सर्व मुख्य अभियंता/मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, जलसंपदा विभाग
सर्व अधीक्षक अभियंता/ अधीक्षक अभियंता व प्रशासक, जलसंपदा विभाग
सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय

**विषय :- शासकीय कामकाजासाठी नॅशनल इन्फॉरमेटीक्स सेंटरच्या ई-ऑफीस (mahaeoffice) प्रणालीच्या अंमलबजावणीबाबत**

संदर्भ:- १) जलसंपदा विभाग शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२२/(०३/२०२२)/संकाक, दि.०८/१२/२०२२
२) सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.विमंअ ३२२२/प्र.क्र.५५ /कार्या-७ दि ६ डिसेंबर, २०२२
३) जलसंपदा विभाग शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२२/(०३/२०२२)/संकाक, दि.१९/०१/२०२३
४) सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.DIT meeting Letter दि २७/२/२०२३

विभागाचे ई ऑफिस प्रणालीचा पूर्णत्वाने वापर करण्याबाबत संदर्भीय शासन पत्र १ व २ अन्वये आपणास कळविण्यात आले आहे.

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भ-४ नुसार दि.१/३/२०२३ रोजी मंत्रालयात बैठक संपन्न झाली असून सदर बैठकीत ई-ऑफीस प्रणालीची माहे एप्रिल २०२३ पासुन १००% अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. यास्तव ई-ऑफीस प्रणालीची अंमलबजावणीबाबत आवश्यक कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच क्षेत्रीय कार्यालयात ई-ऑफीस प्रणालीच्या वापराबाबत केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास लवकरात लवकर सादर करावा.

जलसंपदा विभागातील सर्व नियंत्रक व पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी वरील मार्गदर्शक सूचना त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व कर्मचाऱ्यांच्या निर्दशनास आणण्यात याव्यात व सदर मार्गदर्शक सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल, व ई-ऑफीस प्रणालीची अंमलबजावणी माहे एप्रिल २०२३ पर्यंत होईल याची कृपया दक्षता घ्यावी.

(उध्दव दहिफळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- संगणक कार्यक्रम कक्ष संग्रहार्थ